जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस

P.R.O. Office, Crime Branch, Pune City

**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune Maharashtra – 411001

**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478


## प्रेसनोट क्रमांक - ३९४ दिनांक - २३/०९/२०२४

येरवडा पोलीस स्टेशन,पुणे शहर

### जबरी चोरी करणा-या आरोपीच्या येरवडा तपास पथकाने आवळल्या मुसक्या

दि.०८/०९/२०२४ रोजी सहयाद्री हॉस्पीटल समोर शास्त्रीनगर येरवडा येथे पहाटे ०५/२० वा.चे सुमारास फिर्यादी हे पायी चालत असताना मोटार सायकलवरील अनोळखी इसमांनी फिर्यादी यांचा मोबाईल व १७५००/-रु रोख रक्कम जबरदस्तीने हिसका मारुन चोरुन नेले आहे.म्हणून येरवडा पो.स्टे.गु.र.नं.५७४/२०२४ बीएनएस ३०९(६),३(५) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदर गुन्हयाचा तपास करत असताना दि.१२/०९/२०२४ रोजी तपास पथकाचे पोलीस अंमलदार अनिल शिंदे, प्रशांत कांबळे व स्वप्निल घोलप यांना बातमी मिळाली सदर गुन्हयातील एक संशयीत इसम मांजरी रेल्वे स्टेशनजवळ थांबलेला आहे.सदरची माहिती मा.वरिष्ठ पोलीस निरीक्षक येरवडा पोलीस स्टेशन यांना कळविल्याने त्यांनी मिळालेली माहिती वरुन कारवाई करणेबाबत मार्गदर्शन केले त्याप्रमाणे तपास पथकाचे अधिकारी सपोनि सुनिल सोळुंके व पोलीस अंमलदार अनिल शिंदे,प्रशांत कांबळे,स्वप्निल घोलप,तुषार खराडे,विठ्ठल घुले,सुरज ओंबासे यांनी तेथे जावून संशयीत एक इसमास पळून जात असताना अतिशय शिताफीने पकडले.त्याचे नाव पत्ता याचेबाबत खात्री करता तो विधीसंघर्षित बालक असल्याचे समजले.त्यांचेकडे चौकशी करता त्यांनी चोरी त्याचे इतर तीन साथीदारासह केल्याचे कबूली दिली आहे. सदर गुन्हयामध्ये दोन विधीसंघर्षित बालकांना ताब्यात घेण्यात आले आहे.त्यांचेकडून गुन्हयातील चोरीस गेलेला १५,०००/- किंमतीचा मोबाईल हस्तगत करण्यात आला आहे.

सदरची कामगिरी मा.अपर पोलीस आयुक्त,पूर्व प्रादेशिक विभाग श्री.मनोज पाटील, मा.पोलीस उप-आयुक्त,परिमंडळ-४ श्री.हिम्मत जाधव, मा.सहा.पोलीस आयुक्त येरवडा विभाग श्रीमती प्रांजली सोनवणे वरिष्ठ पोलिस निरीक्षक येरवडा पो.स्टे. श्री.रविंद्र शेळके, पोलिस निरीक्षक (गुन्हे) पल्लवी मेहेर, यांचे मार्गदर्शनाखाली तपास पथकाचे अधिकारी सहा.पो.निरी सुनिल सोळुंके, पोलिस हवा.दत्ता शिंदे,तुषार खराडे,किरण घुटे पोलिस नाईक सागर जगदाळे, पोलिस अमंलदार अनिल शिंदे,सुरज ओंबासे,दत्तात्रय शिंदे,प्रशांत कांबळे,सुशांत भोसले,विठ्ठल घुले,विजय अडकमोल यांनी केलेली आहे.